प्रेसनोट दि. ०६/०१/२०१८

गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक विभागाकडुन भारतीय चलनाच्या ५४,५००/- रुपयांच्या बनावट नोटा बाळगणा-यांस अटक

ooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

दि. ०५/०१/२०१८ रोजी दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर, या पथकातील पोहवा ३२७९ थोरात यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, विद्यानगर, शेवटचा बस स्टॉप, टिंगरे नगर, पुणे येथे एक इसम आपल्या जवळ भारतीय चलनाच्या बनावट नोटा जवळ बाळगुन लोकांना देत आहे. अशी बातमी मिळाल्याने मा.पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र कदम सो. यांनी सदर ठिकाणी जावुन बातमीची खात्री करुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्यांने विद्यानगर येथे येवून बातमीतील वर्णनाचे इसमांचा शोध घेता असता पुन्हा बातमीदाराने खात्रीशीर माहिती दिली की, सदर वर्णनाचा इसम कलवड वस्ती, लोहगाव, पुणे येथील डीसीबी बँक एटीएम बाहेर उभा आहे. मिळालेल्या बातमीनुसार सदर ठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व त्यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचून स्टाफचे मदतीने सदर इसमांस जागीच १७/४० वा.चे सुमारास पकडून त्यांस नाव व पत्ता विचारता त्यांने आपले नाव संदिप वसंत नाफाडे, वय-३४, धेदा-टेलरींग, रा.साठे वस्ती, लेन नं-६, लोहगाव पुणे असल्यांचे सांगीतले. त्यांची अंगझडती घेता त्यांचे पॅन्टचे उजवे खिशात रोख रुपये ५०,०००/- त्यामध्ये १००/-रु. दराच्या ५०० नोटा मिळून आल्या. सदर नोटा बाबत त्यांचेकडे विचारपूस करुन मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने तपास करता, त्याने त्यांचेकडे खिशात मिळून आलेले १००/-रु दराच्या नोटा बनावट असल्याचे कबूल करुन, त्या नोटा त्यांचा साथीदार नामे उदय प्रताप वर्धन, रा. सर्व्हे नां-२५९, प्लॅट नं-१२, कलवड वस्ती, लोहगाव, पुणे यांने तयार केल्या असुन मी त्यांचेकडुन घेवुन बाजारात वटवणार होतो. अशी माहिती सांगितल्याने उदय प्रताप वर्धन हा डीसीबी बँक एटीएम शेजारीच रहात असल्यांचे समजल्याने पोलीस स्टाफ व पंच असे उदय प्रताप वर्धनच्या घरी गेलो असता सदर ठिकाणी एक इसम घरामध्ये लॅपटॅपवर काम करीत असताना दिसला. त्यांस आमची व पंचांची ओळख करुन दिली. त्यांस त्यांचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव उदय प्रताप वर्धन, वय-३४ वर्षे रा. सर्व्हे नां-२५९, प्लॅट नं-१२, कलवड वस्ती, लोहगाव, पुणे असल्यांचे सांगीतले. सदर इसमाकडे लॅपटॉप, प्रिंटर, तसेच प्रिंटरच्या बाजुला १०० रुपये दराच्या नोटा दिसुन आल्यां. त्याबाबत त्यांचेकडे विचारपुस करीता त्यांने सांगीतले की सुमारे पंधरादिवसा पासुन ५०, १०० रुपये दराच्या भारतीय चलनाच्या नोटा लॅपटॅप व प्रिंटरचा उपयोग करुन प्रिंट करुन व कटींग करुन तो त्याचा साथीदार नामे संदिप नाफाडे यांस बाजारात वटवणे करीता देत असतो. उदय प्रताप वर्धन याचे कब्जात १०० रुपये दराच्या ४५ बनावट नोटा असे ४५००/- रुपये, एक एच पी कंपनीचा लॅपटॅप कि रु ३५,०००/-चा. एक एच पी कंपनीचा प्रिंटर कि रु १२०००/- चा, एक छोट्या आकारची कात्री कि रु २०/- ची, प्रिंट कराता लागणारी ए फोर राईज २०० नग कागदे कि रु १००/- रुपये मिळुन आले. असा उदय प्रताप वर्धन व संदिप वसंत नाफाडे या दोघांकडे मिळुन आलेले बनावट नोटा व बनावट नोटा बनवण्याचे साधने एकुण १,०१,६२०/- रु चा मुद्देमाल मिळुन आला तो सविस्तर पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेऊन दोन्ही इसमांविरुध्द विमानतळ पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र. १०/२०१८ भादंवि क ४५९(अ)(क)(ड),३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सपोनि विद्युलता चव्हाण, लक्ष्मण ढेंगळे, स.पो.फौज.संजय दळवी, यशवंत आब्रे, विनायक पवार, शंकर पाटील,पो.हवा.अजय थोरात, निलेश पाटील, पो.ना. महेश कदम, रामदास गोणते, विल्सन डिसोझा यांनी केली आहे.